# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र, मर्यादित
# महा–गृहनिर्माण योजना

प्रधान मंत्री आवास योजना-शहरी
Pradhan Mantri Awas Yojana-Urban

सिडको
शहरांचे शिल्पकार

**सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील विविध नोड्समध्ये आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट यांसाठी बांधण्यात येत असलेल्या एकूण १४८३८ सदनिकांच्या विक्रीसाठी अर्ज नोंदणी योजना जाहीर करण्यात येत असून यांपैकी ५२६२ सदनिका प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी उपलब्ध आहेत.**

## अर्जदारांची नोंदणी, योजनेकरिता शुल्क भरणा व सोडतीचे वेळापत्रक

१) अर्जदारांची ऑनलाईन नोंदणी : दिनांक १३/०८/२०१८ दुपारी २.०० वा. पासून ते दिनांक १६/०९/२०१८ रात्री ११.५९ वा. पर्यंत
२) नोंदणीकृत अर्जदारांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत : दिनांक १५/०८/२०१८ दुपारी २.०० वा. पासून ते दि. १६/०९/२०१८ रात्री ११.५९ पर्यंत
३) अनामत रक्कम व अर्जाचे शुल्क ऑनलाईन भरण्याचा दिनांक : १५/०८/२०१८ दुपारी २.०० वा. पासून दि. १७/०९/२०१८ सायं. ६.०० वा. पर्यंत
४) ऑनलाईन सोडतीचा दिनांक : ०२/१०/२०१८ सकाळी ११.०० वा.

**ऑनलाईन सोडतीचे स्थळ:** सिडको सभागृह, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई– ४०० ६१४.

## आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या सदनिकांचा तपशील

आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) अर्जदारासाठी सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. २५,०००/– पर्यंत
आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) अर्जासोबत भरावयाची एकूण रक्कम रु. ५२८०/– अनामत रक्कम रु. ५०००/– व ऑनलाईन अर्जाचे शुल्क एकूण रु. २८०/– (रु. २५०/– + जीएसटी रु. ३०/– विना परतावा)

| अनु क्र. | योजना | उपलब्ध सदनिका | सदनिकेचे चटई क्षेत्र (चौ.मीटर) | सदनिकेची विक्री किंमत (रु.) | योजना व आरक्षणनिहाय सदनिकांची संख्या | | | | | | | | | | | | महारेरा प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सर्वसाधारण गट | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | भटक्या जमाती | विमुक्त जाती | राज्य शासकीय कर्मचारी | नवी मुंबई क्षेत्रातील पत्रकार | नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त | अंध किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग | माजी सैनिक /सुरक्षा दलातील व्यक्ती | नवी मुंबईतील माथाडी कामगार | केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक आयोग अधिनियम १९९२ च्या राजपत्रातील भाग २(क) मध्ये धार्मिक अल्पसंख्याक म्हणून अधिसूचित (ज्यात मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बुध्दिष्ठ, पारसी आणि जैन यांचा समावेश असेल) | |
| १. | सेक्टर–२७ तळोजा | १४४६ | २५.८१ | १८,५३,१६८.६७ | ७५९ | १५९ | ८७ | २२ | २२ | ७२ | ७२ | ७२ | ४३ | २९ | ७२ | ३६ | |
| २. | सेक्टर–२१ तळोजा | ५५२ | २५.८१ | १८,०३,७८३.११ | २९० | ६१ | ३३ | ८ | ८ | २८ | २८ | २८ | १७ | ११ | २८ | १४ | |
| ३. | सेक्टर–२२ तळोजा | ४३८ | २५.८१ | १८,०३,७८३.११ | २३० | ४८ | २६ | ७ | ७ | २२ | २२ | २२ | १३ | ९ | २२ | १० | |
| ४. | सेक्टर–२९ तळोजा | ४२६ | २५.८१ | १८,०३,७८३.११ | २२४ | ४७ | २६ | ६ | ६ | २१ | २१ | २१ | १३ | ९ | २१ | ११ | |
| ५. | सेक्टर–४० खारघर | ६८४ | २५.८१ | १८,३९,७८७.६७ | ३५९ | ७५ | ४१ | १० | १० | ३४ | ३४ | ३४ | २१ | १४ | ३४ | १७ | |
| ६. | सेक्टर–१५ कळंबोली | ३२४ | २५.८१ | १८,२७,७४१.२३ | १७० | ३६ | १९ | ५ | ५ | १६ | १६ | १६ | १० | ६ | १६ | ८ | |
| ७. | सेक्टर–१०, भूखंड क्र. १, घणसोली | ९६ | २५.८१ | १७,१४,९०६.४९ | ५० | ११ | ६ | १ | १ | ५ | ५ | ५ | ३ | २ | ५ | २ | |
| ८. | सेक्टर–१०, भूखंड क्र. २, घणसोली | ४३२ | २५.८१ | १८,११,८०७.८९ | २२७ | ४८ | २६ | ६ | ६ | २२ | २२ | २२ | १३ | ९ | २२ | ११ | |
| ९. | सेक्टर–११, भूखंड क्र. १, द्रोणागिरी | ३४२ | २५.८१ | १८,४२,४११.०५ | १८० | ३८ | २१ | ५ | ५ | १७ | १७ | १७ | १० | ७ | १७ | ८ | |
| १०. | सेक्टर–१२, भूखंड क्र. ६३, द्रोणागिरी | २६४ | २५.८१ | १८,४२,४११.०५ | १३९ | २९ | १६ | ४ | ४ | १३ | १३ | १३ | ८ | ५ | १३ | ७ | |
| ११. | सेक्टर–१२, भूखंड क्र. ६८, द्रोणागिरी | २५८ | २५.८१ | १८,४२,४११.०५ | १३५ | २८ | १५ | ४ | ४ | १३ | १३ | १३ | ८ | ५ | १३ | ६ | |

## अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिकांचा तपशील

अल्प उत्पन्न गट (LIG) अर्जदारासाठी सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. २५,००१/– ते रु. ५०,०००/– पर्यंत
अल्प उत्पन्न गट (LIG) अर्जासोबत भरावयाची एकूण रक्कम रु. २५२८०/– अनामत रक्कम रु. २५०००/– व ऑनलाईन अर्जाचे शुल्क एकूण रु. २८०/– (रु. २५०/– + जीएसटी रु. ३०/– विना परतावा)

| अनु क्र. | योजना | उपलब्ध सदनिका | सदनिकेचे चटई क्षेत्र (चौ.मीटर) | सदनिकेची विक्री किंमत (रु.) | योजना व आरक्षणनिहाय सदनिकांची संख्या | | | | | | | | | | | | महारेरा प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सर्वसाधारण गट | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | भटक्या जमाती | विमुक्त जाती | राज्य शासकीय कर्मचारी | नवी मुंबई क्षेत्रातील पत्रकार | नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त | अंध किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग | माजी सैनिक /सुरक्षा दलातील व्यक्ती | नवी मुंबईतील माथाडी कामगार | सिडको कर्मचारी | |
| १. | सेक्टर–२७ तळोजा | २६५८ | २९.८२ | २५,८५,६०७.७८ | १३२९ | २९२ | १५९ | २२ | २२ | १३३ | १३३ | १३३ | ८० | ५३ | १३३ | १३३ | |
| २. | सेक्टर–२१ तळोजा | १००२ | २९.८२ | २५,४०,५८०.६२ | ५०१ | ११० | ६० | ८ | ८ | ५० | ५० | ५० | ३० | २० | ५० | ५० | |
| ३. | सेक्टर–२२ तळोजा | ७८६ | २९.८२ | २५,४०,५८०.६२ | ३९३ | ८६ | ४७ | ७ | ७ | ३९ | ३९ | ३९ | २४ | १६ | ३९ | ३९ | |
| ४. | सेक्टर–२९ तळोजा | ७८६ | २९.८२ | २५,४०,५८०.६२ | ३९३ | ८६ | ४७ | ७ | ७ | ३९ | ३९ | ३९ | २४ | १६ | ३९ | ३९ | |
| ५. | सेक्टर–४० खारघर | १२६० | २९.८२ | २६,३५,११५.६२ | ६३० | १३९ | ७६ | १० | १० | ६३ | ६३ | ६३ | ३८ | २५ | ६३ | ६३ | |
| ६. | सेक्टर–१५ कळंबोली | ५८२ | २९.८२ | २६,०१,७७७.७८ | २९१ | ६४ | ३५ | ५ | ५ | २९ | २९ | २९ | १७ | १२ | २९ | २९ | |
| ७. | सेक्टर–१०, भूखंड क्र. १, घणसोली | १५६ | २९.८२ | २५,३८,८८०.३१ | ७८ | १७ | ९ | १ | १ | ८ | ८ | ८ | ५ | ३ | ८ | ८ | |
| ८. | सेक्टर–१०, भूखंड क्र. २, घणसोली | ७९८ | २९.८२ | २५,४९,९४३.३३ | ३९९ | ८८ | ४८ | ६ | ६ | ४० | ४० | ४० | २४ | १६ | ४० | ४० | |
| ९. | सेक्टर–११, भूखंड क्र. १, द्रोणागिरी | ६२४ | २९.८२ | २५,०६,६१०.५८ | ३१२ | ६९ | ३७ | ५ | ५ | ३१ | ३१ | ३१ | १९ | १२ | ३१ | ३१ | |
| १०. | सेक्टर–१२, भूखंड क्र. ६३, द्रोणागिरी | ४७४ | २९.८२ | २५,०६,६१०.५८ | २३७ | ५२ | २८ | ४ | ४ | २४ | २४ | २४ | १४ | ९ | २४ | २४ | |
| ११. | सेक्टर–१२, भूखंड क्र. ६८, द्रोणागिरी | ४५० | २९.८२ | २५,०६,६१०.५८ | २३१ | ५१ | २८ | ४ | ४ | २३ | २३ | २३ | १४ | ९ | २३ | २३ | |

# सिडको गृहनिर्माण योजना, ऑगस्ट –२०१८ ची वैशिष्ट्ये

- नवी मुंबईतील तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली, द्रोणागिरी या नोडमध्ये आकारास येणारी गृहनिर्माण योजना
- एकूण १४,८३८ एवढ्या मोठ्या प्रमाणावर सदनिका उपलब्ध
- अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांधण्यात आलेल्या सदनिका
- सिडकोच्या इतिहासात प्रथमच ऑनलाईन सोडत पद्धतीचा प्रारंभ
- अर्ज नोंदणी, शुल्क भरणा आणि सोडतीची पारदर्शक व सुटसुटीत प्रक्रिया
- यशस्वी अर्जदारांना सदनिकांचा भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर त्वरीत ताबा
- प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ५२६२ सदनिका आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी उपलब्ध
- प्रथमच आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतर्गत धार्मिक अल्पसंख्याकांसाठी राखीव सदनिका

## ऑनलाईन अर्ज भरावयाची पद्धत :

**सोडत २०१८ साठी अर्ज भरण्याची पद्धत खालीलप्रमाणे आहे.**

**टप्पा क्र. १ : अर्जदाराची नोंदणी**

- अर्जदाराने प्रथम https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळास भेट द्यावी.
- ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी अर्जदारांनी माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचावी.
- सर्वप्रथम अर्जदाराने स्वत:चे USER NAME नोंदणी करावे. हे USER NAME कायम लक्षात ठेवावे. अर्जदाराने नोंदणी करण्यासाठी खालील बाबींची माहिती तयार ठेवावी.

  १. कौटुंबिक उत्पन्न २. अर्जदाराचा फोटो (स्कॅन केलेले स्वत:चे सुस्पष्ट पासपोर्ट आकारातील रंगीत व ठळक छायाचित्र असावे व ते ५० KB पर्यंत jpeg format मध्ये असावे.) ३. पॅनकार्डचा तपशील (पॅन क्रमांकाचे ऑनलाईन व्हेरिफिकेशन केले जाईल.) ४. जन्मतारीख पॅनकार्डप्रमाणे ५. व्यवसाय ६. आधारकार्ड क्रमांक ७. राहण्याचा पत्ता ८. भ्रमणध्वनी क्रमांक (शुन्यापासून सुरू करू नये.) ९. ई–मेल आयडी (टीप : सर्व माहिती ई–मेल व एसएमएस द्वारे देण्यात येणार असल्यामुळे ई–मेल आयडी व मोबाईल क्रमांक भरताना काळजी घेणे आवश्यक आहे.) १०. अर्जदाराचा बँक खात्याचा तपशील व बँकेचा एम.आय.सी.आर. क्रमांक

**टप्पा क्र. २ : सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज करणे**

- वरील टप्पा क्र. १ अनुसार नोंदणी केल्यानंतर नोंदीत अर्जादाराचे युजर नेम व पासवर्डचा वापर करून लॉगइन करता येईल. नोंदणी करताना दिलेल्या माहिती अनुसार अनुज्ञेय उत्पन्न गटानुसार अर्ज करता येईल.
- अर्जदाराने नोंदणी करतेवेळी दिलेल्या दिलेली माहिती SUBMIT करेपर्यंत EDIT करता येईल तसेच पाहतासुद्धा येईल.
- योजनेकरिता अर्ज APPLY FOR LOTTERY या लिंक वर क्लिक करावे. असे केल्यानंतर अर्जदाराला उत्पन्न गटानुसार अर्ज करावयाचे विविध योजना संकेत क्रमांकांची माहिती दिसेल.

  यानंतर अर्जदाराला APPLICATION FORM दिसेल. सदर फॉर्म भरताना अर्जदारास योजना संकेत क्रमांक, प्रवर्ग, रकमेचा भरणा करण्याची पद्धत इत्यादी माहितीसह इतर माहिती भरावयाची आहे. (टीप : नोंदणी फॉर्म धील सर्व माहिती APPLICATION FORM मध्ये आपोआप दिसेल.) वरील सर्व माहिती भरल्यानंतर SUBMIT या बटनवर क्लिक करावे. बदल करावयाचे नसल्यास CONFIRM या बटनवर क्लिक करावे. त्यानंतर तळाशी प्रिन्ट एक्नॉलेजमेंट इन इंग्लिश व प्रिंट एक्नॉलेजमेंट इन मराठी यापैकी अर्जदाराने योग्य पर्याय निवडून तेथे क्लिक केल्यास अर्जदाराने भरलेल्या अर्जाची एडिट न करता येणारी पीडीफ (PDF) च्या स्वरूपात फाईल स्क्रिनवर दिसेल. त्यावर १० अंकी अर्ज क्रमांक दिसेल. ही पीडीफ (PDF) अर्जादार सेव्ह करू शकतो व त्याची प्रिंटआऊट घेऊ शकतो. अर्जादाराने अर्जासोबत जमा करावयाच्या अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन पद्धतीने (Internet Banking/ RTGS/NEFT/Credit/Debit Card) द्वारे जमा करावा.

**टप्पा क्र. ३ :**

- अनामत रक्कम भरण्याची पद्धत (Internet Banking/ RTGS/NEFT/Credit/Debit Card)
- ऑनलाईन पेमेंट केल्यास सर्व्हिस प्रोव्हायडरने ठरविलेले शुल्क अर्जदारास अदा करावे लागेल. त्याची माहिती सॉफ्टवेअरमध्ये उपलब्ध आहे.
- एकदा नोंदणी केल्यानंतर त्या अकाऊंटद्वारे अर्जदार एकापेक्षा जास्त प्रवर्ग/योजनेसाठी पात्र असल्यास त्याला एकापेक्षा जास्त अर्ज भरता येईल.
- ऑनलाईन पेमेंट करताना काही वेळेस तांत्रिक अडचणींमुळे अनामत रक्कम महामंडळाच्या खात्यावर जमा न झाल्यास व पुन्हा दुबार प्रयत्न करताना एका अर्जासाठी दोन वेळा अनामत रक्कम महामंडळाच्या खात्यावर जमा झाल्यास याबाबत त्वरीत mm2cidcoindia.com येथे संपर्क साधावा. (दूरध्वनी – ६७१२१०७५, १०७७) अशा प्रकारे दुबार भरणा केलेल्या रकमेचा परतावा सोडतीनंतर करण्यात येईल.
- ऑनलाईन पेमेंट करताना काही तांत्रिक अडचणींमुळे अनामत रक्कम महामंडळाच्या खात्यावर जमा न झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही.
- अर्जामध्ये विचारलेली माहिती अर्जदाराने जाणूनबुजून चुकीची दिल्याचे अर्ज तपासणीमध्ये आढळल्यास असे अर्ज रद्द ठरविण्यात येतील.
- दि. १५/०८/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपासून ते दि. १६/०९/२०१८ रात्री ११.५९ वाजेपर्यंत प्राप्त झालेले ऑनलाईन अर्जच सोडतीसाठी विचारात घेतले जातील.

## आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत) याकरिता विशेष सूचना:

१. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासनाने मंजूर केलेल्या योजना आहेत. या योजनेमधील सर्व सदनिकांना केंद्र शासनाचे रु. १.५० लक्ष व राज्य शासनाचे रु. १.०० लक्ष अनुदान मिळणार आहे.

२. शासन निर्णय गृहनिर्माण विभाग दिनांक १८ ऑगस्ट २०१६, अन्वये पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सदनिकांची पुनर्विक्री सदनिकांचा ताबा मिळाल्यापासून १० वर्ष करता येणार नाही.

## विशेष सूचना :

१) सदर योजनेतील सदनिका वाटपाकरिता नवी मुंबई जमीन विल्हेवाट अधिनियम (सुधारित) २००८ मधील तरतुदी जशाच्या तशा (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह) लागू राहतील.

२) नियोजित योजनेतील सदनिकांचे चटई क्षेत्रफळ, विक्री किंमत व सदनिकांची संख्या अंदाजित असून त्यामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) लाभार्थी अर्जदार यांना शासनाच्या नियमानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क वेगळे अदा करावे लागेल. तसेच संबंधित लाभार्थ्यांनी विक्री किंमती व्यतिरिक्त लागू असल्यास वस्तु व सेवाकराचा (GST) संबंधित शासकीय कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे. मुद्रांक व नोंदणी शुल्क व वरीलप्रमाणे लागू असणारे कर भरणा केल्यानंतरच सदनिकेचा ताबा देण्यात येईल.

४) सर्व पात्र लाभार्थ्यांना सदनिकांची विक्री किंमत महामंडळाने निर्धारित केलेल्या टप्पे निहाय हफ्त्यांनुसार भरणे बंधनकारक आहे. अंदाजे याकरिता सहा हफ्ते ठरविण्यात आले असून हा कालावधी माहे जानेवारीच्या २०१९ ते माहे डिसेंबर २०१९ या कालावधीत राहील व याबाबतची सविस्तर माहिती वाटपपत्रात नमूद करण्यात येणार आहे.

५) संगणकीय सोडतीत कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही. याकरिता अर्जदारांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनांना कदापि बळी पडू नये.

६) सदनिकांच्या सोडती/ विक्रीसाठी सिडको महामंडळाने प्रतिनिधी, सल्लागार किंवा प्रॉपर्टी एजंट म्हणून कोणत्याही व्यक्तीची नेमणूक केलेली नाही. अर्जादाराने अशा प्रकारचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये. अशा प्रकारच्या व्यवहारास/फसवणुकीस सिडको जबाबदार राहणार नाही.

७) संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) प्राप्त झाल्यानंतरच सदनिकेचा ताबा देण्यात येईल.

८) सद्यस्थितीत सर्व सदनिकांचे काम प्रगती पथावर आहे. सदनिकांचा ताबा तीन टप्प्यात देण्यात येणार असून तो अनुक्रमे **ऑक्टोबर २०२०, डिसेंबर २०२० व मार्च २०२१** असा प्रस्तावित आहे.

९) जाहिरात व सोडतीच्या अनुषंगाने काही नवीन सूचना असल्यास तसे https://cidco.maharashtra.gov.in तसेच https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळांवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.

१०) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जातींच्या प्रवर्गातील अंतिमत: पात्र लाभार्थींना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

११) जे अर्जदार सोडतीमध्ये विजेते ठरतील ते वगळून, उर्वरित अर्जदारांनी भरलेली अनामत रक्कम त्यांच्या अर्जातील नमूद बँक खात्यामध्ये परस्पर सोडतीच्या दिनांकापासून १५ दिवसांत जमा केली जाईल.

१२) सदर योजनेची संपूर्ण माहिती जसे एकूण योजना, त्यामधील सदनिकांची संख्या, विक्री किंमत, चटई क्षेत्र, आरक्षण प्रवर्ग, पात्रतेच्या अटी व निकष, अर्ज करण्याची पध्दत (Help File), संगणकीय सोडतीची कार्यपध्दती, सोडती नंतर दाखल करावयाचा तपशील, वाटपाच्या अटी व शर्ती, योजनांचे नकाशे, अभिन्यास, प्रतिज्ञापत्राचे नमूने व योजनेचे वेळापत्रक https://lottery.cidcoindia.com येथे दिलेल्या माहिती पुस्तिकेमध्ये सविस्तरपणे देण्यात आलेली आहे.

१३) यशस्वी अर्जदारांना E-mail/SMS द्वारे वेळोवेळी सुचीत करण्यात येईल.

१४) माहितीपुस्तिका व अर्जाचा नमुना दिनांक **१३/०८/२०१८** पासून संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१५) जाहिरातीमध्ये अनावधाने झालेल्या छपाईच्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदाराला फायदा घेता येणार नाही.

१६) या योजनांतर्गत आलेला कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचा अधिकार पणन व्यवस्थापक २, सिडको महामंडळ यांनी राखून ठेवला आहे.

१७) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत) सदनिका वगळून या जाहिरातीमधील उर्वरित अल्प उत्पन्न गटाच्या सर्व योजने मधील घरे प्रधानमंत्री आवास योजने नुसार CLSS अंतर्गत व्याजावर अनुदान मिळण्यास पात्र राहतील. या लाभार्थ्यांनी HUDCO/NHB कडे अनुदानासाठी संपर्क साधावा.

## तक्रार निवारण :

सदर वेब पोर्टलवर अर्जदार नोंदणी, योजनेकरिता अर्ज भरणे, शुल्क भरणा व इतर कोणत्याही प्रकारची समस्या / अडचण असल्यास Contact us यावर क्लिक करावे व यामधील Raise a Complaint वर दिलेल्या Drop menu मधिल योग्य पर्याय निवडून आपली तक्रार द्यावी. सदर तक्रारीचे तात्काळ निरसन करण्यात येईल याबाबत आपल्याला कळविले जाईल.

**पणन व्यवस्थापक–२,**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र, मर्यादित.**

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**पणन व्यवस्थापक –२ यांचे कार्यालय, तिसरा मजला, रायगड भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०००६१४ .**

**सिडकोचे ऑनलाईन अर्जाकरिता संकेतस्थळ : https://lottery.cidcoindia.com**
**हेल्पलाईन नं.: ०२२–६७१२ १०१६/१०७७/११५८**

सिडको
शहरांचे शिल्पकार

नोंदणीकृत कार्यालय : 'निर्मल', दुसरा मजला, नरिमन पॉइंट, मुंबई –४०० ०२१ ● दूरध्वनी : +९१–२२–६६५० ०९०० ● फॅक्स: +९१–२२–२२०२२५०९.
मुख्य कार्यालय : सिडको भवन, सी.बी.डी बेलापुर, नवी मुंबई–४०० ६१४ ● दूरध्वनी : +९१–२२–६७९१ ८१०० ● फॅक्स: +९१–२२–६७९१८१६६.
www.cidco.maharashtra.gov.in